माहितीचा
अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ७११/२०२२**

**अपिलार्थी, श्री. नरसिंह शिवचरण बागडे**

**विरुध्द**
**जन माहिती अधिकारी**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान कार्यालय, नागपूर-४४००२२**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान कार्यालय, नागपूर-४४००२२,**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **अनुपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.१२.२०२१ | निरंक | ०१.०२.२०२२ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दिनांक १६.१२.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अर्ज सादर केले असून त्यात त्यांनी "सप्टेंबर-२०१७ ते मार्च २०१९ पर्यंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान नागपूर यांच्या तर्फे भारतरत्न डॉ. बी.आर.आंबेडकर यांच्या-१२५ व्या जयंतीच्या अनुषंगाने, विविध उपक्रम राबविण्यासाठी एकुण किती निधी प्राप्त झाला, त्यापैकी कोणकोणत्या बाबींवर किती खर्च झाला व उर्वरीत अखर्चित किती निधी शासनास जमा करण्यात आला आणि या दरम्यान आहरण व संवितरण अधिकारी कोण होते यांची तपशीलवार लिखीत स्वरुपात पुरावे सहित माहिती देण्यात यावी " याबाबत माहिती मागितलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०१.०२.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे " माहिती न दिल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी अथवा कोणतेही आदेश पारित केल्याचे कागदपत्रांवरुन दिसुन येत नाही.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक १०.०३.२०२२ रोजी " जोडपत्र अ व ब द्वारे मागितलेली माहिती संबंधीत कार्यालयाने

सादर न केल्यामुळे, जोडपत्र ब चे उल्लंघन केल्यामुळे योग्य ती शास्ती लावण्यात यावी " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०७.०५.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. नागसेन बागडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. सिध्दार्थ गायकवाड ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, प्रस्तुत प्रकरणात विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त झाली नसल्याचा दावा करीत अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०२.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला. प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली नसल्याचा तसेच आदेश पारित केला नसल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक १०.०३.२०२२ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे. आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी हजर नाही. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान नागपूर यांच्या वतीने विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. नागसेन बागडे व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी डॉ. सिध्दार्थ गायकवाड ऑनलाईन पध्दतीने उपस्थित असुन, वरील दोन्ही अधिकारी यांचेकडे प्रस्तुत कार्यभार हा अतिरीक्त स्वरुपात असल्याने त्या संदर्भात प्राधिकरणाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या लेखी खुलाशात समता प्रतिष्ठान येथील सर्व दस्ताऐवज हे तपासणी करीता दिनांक १६.०६.२०२१ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेकडर संशोधन व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे या कार्यालयात पाठविण्यात आली होती. अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज हा दिनांक १६.१२.२०२१ रोजी प्राप्त झाला होता. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ व्या जयंती निमीत्त सर्व खर्च बार्टी पुणे या कार्यालया मार्फत करण्यात आला असुन, त्यामुळे सदर कंपनीत जमा खर्चाचा व्यवहार झाला नसल्याने या खर्चासंबंधी आवश्यक दस्ताऐवज व पावत्या या अभिलेखामध्ये उपलब्ध नाही. तसेच अपील अर्ज दाखल करण्याच्या कालावधीत समता प्रतिष्ठान येथे नियमीत कर्मचारी नियुक्त नव्हते माहितीचा अधिकाराचा अर्ज हा कंत्राटी कर्मचाऱ्याकडून स्विकारण्यात आला व त्यावर अनवधानाने कुठलाही अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे त्यावर प्रक्रीया करण्यात आली नव्हती. यात माहिती न पुरविण्याचा कुठलाही हेतू नसुन सद्यस्थिती कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती ही पुरविण्याची हमी व्यवस्थापकीय संचालक तथा अपिलीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठान यांच्या वतीने देण्यात आलेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या सामाजीक न्याय व विशेष सहाय विभाग यांच्या दिनांक ०९.१०.२०१५ रोजीच्या परिपत्रकाची प्रत मंत्री मंडळ निर्णय दिनांक २२.०९.२०१५ रोजीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक २७.०३.२०१७ रोजीचे परिपत्रक तसेच २९.०९.२०२१ रोजीचे वित्त विभागाचे परिपत्रक दिनांक १६.०६.२०२१ रोजी समाज कल्याण विभाग, नागपूर येथील प्रादेशिक उपायुक्त यांनी समता प्रतिष्ठान नागपूर कार्यालयाच्या उपक्रम व कार्यालयीन खर्चाच्या सर्व नस्तीस हस्तांतर करण्याबाबत महासंचालक बार्टी यांना निर्गमित केलेले पत्र व बार्टी या संस्थेच्या वतीने दिनांक १२.०६.२०२३ रोजी प्रादेशिक उपायुकत, समाज कल्याण विभाग यांना समता प्रतिष्ठान नागपूरचा नस्ती व उर्वरीत दस्ताऐवज हस्तांतरीत करण्यातबाबत



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

निर्गमित केलेले पत्र इत्यादी तपशील सादर केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणी झालेला खर्च हा महाराष्ट्र शासनाच्या मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या अंतर्गत उपक्रम यांच्या मार्फत झालेला असतांना वरील अर्ज हा माहितीचा अधिकारात कलम ४ (१) (ख) अन्वये उघड करणे आवश्यक असुन, प्रस्तुत प्रकरणी झालेला खर्च हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती निमित्त विविध उपक्रमांवर खर्च झाले असुन, खर्च झालेला कालावधी लक्षात घेता, प्रस्तुत प्रकरणी समता प्रतिष्ठान येथील विद्यमान अधिकाऱ्यांनी समता प्रतिष्ठान यांनी स्वत:च्या संकेतस्थळावर याबाबतीतील माहिती योग्य त्या छाननी नंतर सर्वांसाठीच उपलब्ध करुन देण्याच्या सुचनेसह, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०७.०५.२०२४**

जावक क्रमांक EC22 दिनांक 26 SEP 2024